दैनिक

www.sahyandrinews.com

# सह्याद्रीचा राखणदार

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

Scan QR code to visit... Epaper Portal

Scan QR code to visit... Epaper Portal

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक १३३ • Title - Code :- MAHMAR49513 • रविवार दि.११ फेब्रुवारी २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# बाबा सिद्धीकींचा अजित गटात जाहीर प्रवेश

## मी ज्यांची साथ सोडली त्यांना सांगितले मला डिवचू नका, अन्यथा मी सोडणार नाही

**मुंबई–**मुंबईतील काँग्रेसचे बडे नेते, माजी आमजार, माजी मंत्री बाबा सिद्दीकी यांनी ऐन लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर काँग्रेस पक्षाचा राजीनामा दिला. तर आज १० फेब्रुवारीला त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गटात जाहीर प्रवेश केला. त्यांच्याबरोबर अनेक कार्यकर्तेही सहभागी झाले. या कार्यक्रमात अजित पवार आणि प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे यांची प्रमुख उपस्थिती होती. बाबा सिद्दीकी म्हणाले की, गेल्या ४८ वर्षांनंतर मी आज पहिल्यांदा काँग्रेससाठी भाषण करत नाहीय. राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये येण्याच्या निर्णयाबाबत म्हणाले, प्रफुल्ल पटेल यांच्या घरी न्याहारी करताना ही चर्चा झाली, त्याच दिवशी १० तारखेला मी राष्ट्रवादीत प्रवेश करणार असे ठरले.मी त्याच दिवशी काँग्रेसच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना याची माहिती दिली आणि ४८ वर्षांनी काँग्रेस सोडण्याचा निर्णय घेतला. मी एक खुले पुस्तक आहे. मी कुटुंबाचा माणूस आहे. मला कोणाचेही नुकसान करायचे नाही. येथे समाजाचे राजकारण सुरू आहे, त्यामुळे निर्णय घ्यावा लागला.मी सांगितले की मला डिवचू नका, अन्यथा मी सोडणार नाही. मी विश्वासघात करणार नाही. मला प्रत्येक हातात अजित पवारांचे घड्याळ हवे आहे. तसंच, सर्वांना सोबत घेऊन चालायचं आहे. आपल्या पूर्वजांनी जे स्वप्न पाहिलं होतं तसा भारत निर्माण करूया, असे ते म्हणाले.बाबा सिद्दीकी यांना शुभेच्छा असतील ते माझे वडील आहेत. त्यांच्यासाठी आजचा दिवस मोठा आहे. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार हे माझ्या कार्यालयात आलेत ही आनंदाची गोष्ट आहे. मी सध्या काँग्रेस पक्षातच आहे. यापूर्वी एक मुख्यमंत्री होते. ते माझ्या कार्यालयाजवळ कार्यक्रम ठेवायचे पण मला निमंत्रण देखील देत नसायचे, अशी खंत झिशान सिद्दीकी यांनी बोलून दाखवली आहे. मी काँग्रेस नेतृत्वाकडे याबाबत हा मुद्दा घेऊन गेलो होतो. या जागेवर शिवसेनेची म्हणजेच ठाकरे गटाची नजर आहे. आपण फार काही करु शकत नाही, असे स्पष्टपणे सांगितले होते. मात्र, वरिष्ठ नेते तरुण आमदाराला पाठबळ देत नसतील तर दुर्दैवाची गोष्ट आहे. पण तरीही मी काँग्रेसमध्येच आहे झिशान सिद्दीकी म्हणाले, महाविकास आघाडी सांभाळण्याच्या नादात काँग्रेस पक्षाचे नुकसान होत आहे. मी जेव्हा आवाज उठवायचो अन्यायाविरोधात तेव्हा काँग्रेसचे वरिष्ठ नेते साथ देत नाहीत. पण अजित पवारांनी मला अर्थमंत्री असताना मदत केली. मी टर्म संपणार म्हणून वाट बघत नाही, मी काँग्रेस पक्ष सोडण्याच्या विचारात नाही.माझे वडील आज राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये गेले त्यांना माझ्या शुभेच्छा आहेत. राहुल गांधी यात्रेत बिझी आहेत. वरिष्ठ नेत्यांशी बोलतोय, पण त्यांचे हात बांधलेले आहेत. संजय निरुपम यांच्याबाबत बोलताना सिद्दीकी म्हणाले, आम्ही गल्लीतील नेत्यांशी बोलत नाही, दिल्लीतील वरिष्ठ नेत्यांशी बोलतो. त्यामुळे स्थानिक पातळीवरच्या कार्यकर्त्यांचे मनोबल खच्ची होते, असे ही झिशान सिद्दीकी एका वृत्तवाहिणीशी बोलताना म्हणाले.



# चंद्रपुरात इंडस्ट्रियल एक्सपो बिजनेस अँड इन्व्हेस्टमेंट कॉनक्लेव्हचे होणार आयोजन

## जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला आयोजनाबाबत आढावा

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

चंद्रपुरात इंडस्ट्रियल एक्सपो बिजनेस अँड इन्व्हेस्टमेंट कॉनक्लेव्हचे आयोजन १ व २ मार्च रोजी करण्यात येत आहे. या एक्सपोच्या यशस्वी आयोजनाबाबत जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी जिल्ह्यातील उद्योजकांसमवेत आढावा घेतला.



जिल्हाधिकारी कार्यालयातील विस कलमी सभागृहात पार पडलेल्या बैठकीला मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, मनपा आयुक्त विपिन पालीवाल, निवासी उपजिल्हाधिकारी संजय पवार, उपजिल्हाधिकारी दगडू कुंभार, रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राचे सहाय्यक आयुक्त भैय्याजी येरमे, विशेष कार्य अधिकारी डॉ. विजय इंगोले, तसेच जिल्ह्यातील विविध औद्योगिक संघटनेचे प्रतिनिधी उपस्थित होते.जिल्हाधिकारी विनय गौडा म्हणाले, नागपूर येथे नुकतेच औद्योगिक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. त्याच धर्तीवर चंद्रपुरात इंडस्ट्रियल एक्सपो बिजनेस अँड इन्व्हेस्टमेंट कॉनक्लेव्हचे आयोजन करण्यात येत आहे. १ व २ मार्च या दोन दिवसीय कालावधीत वन अकादमी येथे सदर कार्यक्रम पार पडणार आहे. यासाठी उद्योग विभागाने प्लॅन करून योग्य नियोजन करावे. एमआयडीसी क्षेत्रासोबतच जिल्ह्यातील इतरही उद्योगांची यादी तयार करावी. एक्सपो कार्यक्रमाबाबत सर्व उद्योगांना कळवावे. तसेच जिल्ह्यातील विविध उद्योगांशी संबंधित असलेल्या संघटना व लोकांना एक्सपोमध्ये आमंत्रित करावे.जिल्हाधिकारी श्री. गौडा पुढे म्हणाले, सदर एक्सपोमध्ये २०० स्टॉल उभारण्याचे नियोजन आहे. यासाठी जागा निश्चित करावी. जिल्ह्यातील मायनिंग आणि मिनरल्स, कोल, आयरन, स्टील, सिमेंट मॅन्युफॅक्चरिंग, शिक्षण, एफ.आय.डी.सी, टुरिझम, पावरप्लांट, फ्लाईंग क्लब, बांबू आणि पेपर उद्योग आदी उद्योगांचे स्टॉल उभारणे अपेक्षित आहे. या एक्सपोमध्ये संबंधित उद्योगांवर आधारित मार्गदर्शकांचे मार्गदर्शनपर सत्र पार पडणार आहे. सदर सत्र विहित वेळेत पार पाडण्यासाठी नियोजन करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी श्री. गौडा यांनी बैठकीत दिल्या.

# स्पर्धा परीक्षा तयारी कार्यशाळेचे आयोजन

**तळोधी (बा) । प्रतिनिधी**

तळोधी (बा.) येथील यादवराव पोशट्टीवार कला महाविघालयात रोजगार मार्गदर्शन व प्लेसमेंट सेल, विद्यार्थी कल्याण विभाग, ग्रंथालय व माहिती शास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने स्पर्धा परीक्षा तयारी याविषयावर एकदिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेत कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य, प्रमुख अतिथी महाविद्यालयातील माजी विद्यार्थी संतोष नन्नावार, पीएसआय मोसम मोहुर्ले , विद्यार्थी कल्याण विभाग प्रमुख प्रा. चिटमलवार आदि मंचावर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात दिपप्रजल्वन व सरस्वती मातेच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आले. यावेळी प्रा. चिटमलवार यांनी विद्यार्थी कसा घडतो व यशस्वी होतो याच उदाहरण त्यांनी सत्कारमुर्ती माजी विद्यार्थी मोसम मोहुर्ले व संतोष नन्नावार यांचा शैक्षणिक प्रवास प्रास्ताविकेतुन मांडले. त्यानंतर संतोष नन्नावार , मोसम मोहुर्ले यांचा सत्कार मद्यविद्यालयाचे प्राचार्य यांच्या हस्ते शाल व श्रीफळ देवून करण्यात आले. यावेळी मोसम मोहूर्ले यांनी महाविद्यालयाच्या जीवनात विद्यार्थ्यांनी आपली आवड पाहुन स्पर्धा परीक्षेच्या अभ्यासाची सुरुवात करावी असे प्रतीप्रादन केले. तसेच स्पर्धा परीक्षेत यशस्वी व्हायचे असेल तर विद्यार्थ्यांनी संयम, कठोर परिश्रम, सातत्य ठेवायला हवे असा मुलमंत्र त्यांनी यावेळी दिले. संतोष नन्नावार सर यांनी विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी नियमीत वर्तमानपत्र वाचावे , स्पर्धापरीक्षेवर आधारीत पाक्षीक, युटच्यबवरील स्पर्धा परीक्षेचे व्हीडीओ इ. साधनांचा उपयोग करावा. तसेच त्यांनी अभ्यासाच्या योग्य तंत्राविषयी मौलीक माहीती दिली. महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी विद्यार्थ्यांचे यश हे महाविद्यालयाला गौरव प्राप्त करून देतात. तसेच यावेळी नन्नावर व मोसम मोहुर्ले यांच्या यशाचे कौतुक केले व विद्यार्थीनी आपल्या जीवनात सकारात्मक रहावे असे मत अध्यक्ष मनोगतातून व्यकत केले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. शशीकांत शेंडे व प्रा. गणेश नवघडे यांनी आभार व्यक्त केले. या कार्यक्रमाला विद्यार्थीनी उत्स्फूर्त प्रतीसाद दिला .या कार्यक्रमाच्या यशाकरीता शिक्षक , शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांनी सहकार्य केले.



# 'रन फॉर लेप्रसी मॅरेथॉन' च्या माध्यमातून कुष्ठरोगा बाबत जनजागृती



**चंद्रपूर । प्रतिनिधी**

२०२७ पर्यंत कुष्ठरोगाचे निर्मूलन करण्याकरीता जिल्ह्यात ३० जानेवारी ते १३ फेब्रुवारी २०२४ या कालावधीत कुष्ठरोग जनजागृती मोहीम राबविण्यात येत आहे. त्या अनुषंगाने आज (दि.१० फेब्रुवारी) शहरात रन फॉर लेप्रसी मॅरेथॉनचे आयोजन महानगरपालिका येथून करण्यात आले. रन फॉर लेप्रसी मॅरेथॉन मध्ये ३३३ नागरिकांनी सहभाग घेतला. सदर मॅरेथॉनचा उद्देश लोकांपर्यंत कुष्ठरोगाबाबत असलेले समज, गैरसमज दूर करणे व जनसामान्यांमध्ये कुष्ठरोगाबाबत जनजागृती करणे हा आहे.

यावेळी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. महादेव चिंचोळे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.अशोक कटारे,( सहाय्यक संचालक (कुष्ठरोग) डॉ. संदीप गेडाम, डॉ. बंडू रामटेके, डॉ. हेमचंद्र किन्नाके, डॉ. वनिता गर्गेलवार, डॉ. कांचन टेंभुर्णे आदी सहभागी झाले होते.कुष्ठरोग हा प्राचीन काळापासून चालत आलेला मायकोबॅक्टेरियम लेप्री तंतुमुळे होणारा एक अत्यंत सांसर्गिक आजार आहे. कुष्ठरोग हा मुख्यतः चेतातंतू व त्वचेचा रोग आहे. कुष्ठरोग आजारामध्ये त्वरित उपचार व योग्य काळजी न घेतल्यास कायमची विकृती येते. त्यामुळे समाजात अशा व्यक्तीबद्दलची भीती, अवहेलना व कलंकाचे मूळ कारण आहे. कुष्ठरोग हा अनुवंशिक आजार नाही. कुष्ठजंतूचा प्रसार हा उपचार न घेतलेल्या सांसर्गिक कुष्ठरुग्णांच्या खोकल्यातून, शिंकण्यातून हवेत पसरतात. आणि निरोगी व्यक्तीला श्वसन मार्गातून कुष्ठजंतूचा संसर्ग होतो. वेळीच उपचार न घेतल्यास कुष्ठरोगामुळे चेतातंतू बाधित होऊन कायमची शारीरिक विकृती येऊ शकते व अवयव अकार्यक्षम होतो. कुष्ठरोगामध्ये फिकट, लालसर व उंचलेले चट्टे तसेच त्वचा तेलकट व गुळगुळीत होते. कानाच्या पाळ्या जाड होतात व काही रुग्णांच्या चेहऱ्यावर, हातापायावर सूज येते किंवा शरीरावर गाठी येतात.

**लक्षणे आढळल्यास त्वरित उपचार घ्या:**

कुष्ठरोगाची लक्षणे आढळल्यास आपल्या विभागातील सीएचव्ही, आरोग्य कार्यकर्ती, आरोग्य कर्मचारी किंवा नजीकच्या सरकारी दवाखान्यात जाऊन तपासून घ्यावे. सर्व सरकारी, निमसरकारी दवाखाने, मनपा मधील सर्व आरोग्य केंद्र व दवाखान्यांमध्ये मोफत उपचार उपलब्ध आहे. डॉक्टरांच्या सल्ल्याने बहुविध औषधोपचार हा ६ किंवा १२ महिने नियमित घेऊन पूर्ण केल्यास कुठल्याही स्थितीत कुष्ठरोग हा पूर्णपणे बरा होतो व संभाव्य विकृती टाळता येते.

**मॅरेथॉनमध्ये विजेत्यांना बक्षीस वितरण:**

रन फॉर लेप्रसी मॅरेथॉन मध्ये सहभागी सहभागी झालेले पुरुष गटातून प्रथम क्रमांक प्राप्त विजेते क्रिश सतींदर मिस्त्री, द्वितीय पुरस्कार प्राप्त रितिक दशरथ शेंडे, तृतीय पुरस्कार प्राप्त शिवाजी नंदकिशोर गोस्वामी तसेच महिला गटातून प्रथम पुरस्कार प्राप्त आचल रमेश कडूकर, द्वितीय पुरस्कार प्राप्त तेजस्विनी पवनकुमार कामडे तसेच तृतीय पुरस्कार प्राप्त रुचिका सुनील नागरकर यांना सहाय्यक संचालक (कुष्ठरोग) डॉ. संदीप गेडाम यांच्या हस्ते धनादेश देऊन सन्मानित करण्यात आले.

# रासेयो शिबिरातून स्वयंसेवक घेत आहेत बांबू क्राफ्टचे धडे

## स्मार्ट ग्राम बिबी येथे ७ दिवसीय कार्यशाळा

**गडचांदूर । प्रतिनिधी**

शरदराव पवार कला व वाणिज्य महाविद्यालय, गडचांदूर येथील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व जिल्हा स्मार्ट ग्राम बिबी यांच्या विद्यमाने सात दिवसीय राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबिराचे उद्घाटन बुधवारी पार पडले. शिबिरात रासेयोचे विद्यार्थी बांबू क्राफ्टचे प्रशिक्षण घेत असून यामुळे विद्यार्थ्यांचे कौशल्य विकसित होणार आहे.

उद्घाटनीय कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरस्वती शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. आनंद अडबाले उपस्थित होते तर उद्घाटन संस्थेचे सचिव नामदेव बोबडे यांच्या हस्ते पार पडले. प्रमुख अतिथी म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय सिंह, उपसरपंच प्रा. आशिष देरकर, ग्रामविकास अधिकारी धनराज डुकरे, ग्रामपंचायत सदस्य सूरज कुळमेथे, शाळा व्यवस्थापन अध्यक्ष सलमा पठाण, नरेश मामीलवाड, आनंद पावडे, बापूजी पिंपळकर आदी मान्यवर उपस्थित होते. या शिबिराच्या माध्यमातून आरोग्य, स्वच्छता, पर्यावरण, मतदार जनजागृती हे उपक्रम राबविले जात आहे. सोबतच विशेष उपक्रम म्हणून प्रशिक्षक राजू राणे यांच्या मार्गदर्शनात शिबिरार्थ्यांना कौशल्य विकास अंतर्गत बांबू क्राफ्टचे प्रशिक्षण मिळत आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कार्यक्रम अधिकारी डॉ. शरद बेलोरकर यांनी केले तर आभार प्रा. डॉ. माया मसराम यांनी मानले. सदर कार्यक्रमाला गावातील प्रतिष्ठित नागरिक, विद्यापीठ आपल्या गावी उपक्रमातील विद्यार्थी व शिबिरार्थी उपस्थित होते.



# कत्तलीसाठी तेलंगणात जाणाऱ्या ३२ जनावरांची सुटका

## सात जणांना अटक : गोंडपिपरी पोलिसांची कारवाई

**गोंडपिपरी । सूरज माडूरवार**

गोवंशीय जनावरांची पायदळ तस्करी करणाऱ्या आरोपींना गोंडपिपरी पोलिसांनी दि.(९) शुक्रवारी सायंकाळी चार वाजता दरम्यान ३२ जनावरांची सुटका केली तीन लाख वीस हजाराचा माल जप्त करत याप्रकरणी पाच जणांना अटक करण्यात आली .

तेलंगणा राज्याची सीमा गोडपिपरी तालुक्याला लागून असल्याने छुप्या मार्गाने वाहनात कोंबून तर कधी पायदळ जनावरांची नेहमीच कत्तलीसाठी तस्करी होत असते.अशातच नव्याने रुजू झालेले ठाणेदार हत्तीगोटे यांना तस्करीची माहिती मिळताच सहकारी मनोहर मत्ते,गणेश पोदाळी,विलास कोवे,संजय कोंडेकर,विजय पवार या पोलिसांसह वढोली गाठून आरोपींना ताब्यात घेत जनावरांची सुटका केली.त्यानंतर १६ जनावरांना बोरगाव येथील कोंडवाड्यात तर उर्वरित १६ जनावरांना धाबा येथील कोंडवाड्यात पाठवण्यात आले.



" मूल – वढोली विठ्ठलवाडा मार्गे गोवंशीय जनावरांची पायदळ वाहतूक करून आरोपी हे नंदवर्धन नदीघातातून जनावरांना डोंग्याला बांधून प्रवास करत तेलंगणात तस्करी करतात. आरोपींविरुद्ध महाराष्ट्र प्राणी संरक्षण सुधारणा प्राणी अधिनियम १९९५ च्या विविध कलमानुसार गोंडपिपरी पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# रायबहादूर उपाधीचे त्यागी !

**जमनालालजी बजाज यांनी स्त्रीशिक्षणास अग्रक्रम देऊन स्त्रियांना समान हक्क मिळवून देण्याचा प्रयत्न केला. त्याकरिता वर्धा येथे त्यांनी मारवाडी शिक्षण मंडळाची स्थापना केली. तसेच गांधींच्या मूलोद्योग शिक्षणावर भर दिला आणि राष्ट्रीयतेची भावना जोपासली व अस्पृश्यतानिवारणाचे महान कार्य अंगीकारले. त्यांनी खिलाफत चळवळीतही भाग घेतला होता. अखेरच्या दिवसांत सेवाग्राम आणि गोसेवासंघ या कार्यास त्यांनी स्वतःला वाहून घेतले होते. गांधीवादी मार्गाने स्वराज्य मिळेल, यावर त्यांची दृढ श्रध्दा होती. म्हणूनच त्यांनी खादी, ग्रामोद्योग व गोसेवा यांचा पुरस्कार केला. त्यांच्याबद्दल महत्वपूर्ण संकलित माहिती श्री कृष्णकुमार आनंदी–गोविंदा निकोडे गुरूजींनी सदर लेखात मांडली आहे... संपादक.**

जमनालालजी बजाज यांचा जन्म राजस्थानमधील सिकल जिल्ह्यातील कासी का बास या गावात दि.४ नोव्हेंबर १८८९ मध्ये झाला. अवघ्या चार वर्षांचे असताना वर्ध्याचे सेठ बच्छराज बजाज यांनी नातू म्हणून दत्तक घेतले. बच्छराज यांचा वर्धा शहर आणि विदर्भात कापसाच्या रुई गाठींचा व्यवसाय होता. जमनालालजी यांचा वयाच्या तेराव्या वर्षी जानकीदेवी यांच्यासोबत विवाह झाला. त्यावेळी बालविवाहाची प्रथा सर्वत्र प्रचलित होती. जमनालाल व जानकीदेवी या दाम्पत्याने पुढे मात्र या प्रथेविरोधात मारवाडी समाजासह इतर समाजासाठी कार्य केले. जमनालाल यांना बालपणापासूनच विलासी जीवन, श्रीमंती आवडत नसे, ते यात रमत नसत. राष्ट्रवाद त्यांच्या नसानसात वसत होता. लोकमान्य टिळकांच्या केसरीचे ते वाचक होते. १३ वर्षाच्या जमनालाल यांनी आपल्या पॉकेटमनीची बचत करून दान म्हणून १०० रुपये या वर्तमानपत्राला पाठविले होते. या काळातच ते गांधीजींच्या दक्षिण आफ्रिकेतील चळवळीविषयी आकर्षित झाले. जेव्हा गांधीजी भारतात आले तेव्हा जमनालाल त्यांच्याशी भेटले आणि सतत संपर्कात राहिले. गांधीजींना सन १९३४मध्ये वर्धा, सेवाग्राम येथे आणून कर्मभूमी करण्यास भाग पाडले. त्यासाठी त्यांनी सेवाग्राम व वर्धा येथील मोठी जागाही दिली.

जमनालाल बजाज हे एक गांधीवादी देशभक्त व बजाज उद्योगसमूहाचे प्रवर्तक होते. त्यांचा जन्म पूर्वीच्या जयपूर संस्थानातील कासीकाबास या खेड्यात एका गरीब कुटुंबात झाला. वडील कनिराम व आई बिरदीबाई होत. वयाच्या चौथ्या वर्षी जमनालाल वर्ध्याचे बच्छराज बजाज या लक्षाधीशाच्या घरात दत्तक गेले. त्यांचे प्राथमिक शिक्षण वर्धा येथे झाले. नंतर त्यांनी इंग्रजी, हिंदी, गुजराती या भाषा आत्मसात केल्या; पण कोणतीही पदवी त्यांनी घेतली नाही. विद्यार्थिदशेतच त्यांचा विवाह सन १९०२ साली इंदूर संस्थानातील जावरा येथील शेठ गिरधारीलाल जाजोदिया यांच्या जानकीदेवी या मुलीशी झाला. कमलनयन व रामकृष्ण हे त्यांचे दोन मुलगे. ते उद्योगपती म्हणून ख्यातनाम आहेत. त्यांपैकी कमलनयन हे लोकसभेचे काही वर्षे सभासद होते, ते सन १९७२ मध्ये निवर्तले.

जमनालालजींनी स्त्रीशिक्षणास अग्रक्रम देऊन स्त्रियांना समान हक्क मिळवून देण्याचा प्रयत्न केला. त्याकरिता वर्धा येथे त्यांनी मारवाडी शिक्षण मंडळाची स्थापना केली. तसेच गांधींच्या मूलोद्योग शिक्षणावर भर दिला आणि राष्ट्रीयतेची भावना जोपासली व अस्पृश्यतानिवारणाचे महान कार्य अंगीकारले. त्यांनी खिलाफत चळवळीतही भाग घेतला होता. अखेरच्या दिवसांत सेवाग्राम आणि गोसेवासंघ या कार्यास त्यांनी स्वतःला वाहून घेतले होते. गांधीवादी मार्गाने स्वराज्य मिळेल, यावर त्यांची दृढ श्रध्दा होती. म्हणूनच त्यांनी खादी, ग्रामोद्योग व गोसेवा यांचा पुरस्कार केला. आधुनिक भारताच्या औद्योगिक क्षेत्रातही जमनालाल बजाज यांनी स्पृहणीय कामगिरी केली. त्यांनी १९२६ साली बजाज उद्योगसमूहाचा सुसंघटित पाया घातला आणि त्या उद्योगसमूहातर्फे पहिला साखर कारखाना सुरू केला; तथापि एक विश्वस्त म्हणूनच ते बजाज उद्योगसमूहाचे काम पाहत असत.

तरूणपणीच जमनालाल यांना लोकमान्य टिळक, पंडित मदनमोहन मालवीय, रवींद्रनाथ टागोर इ.थोर व्यक्तींचा सहवास लाभला. लोकमान्यांचा केसरी वृत्तपत्र ते लहानपणापासून वाचत. सन १९१५मध्ये गांधीजी दक्षिण आफ्रिकेच्या दौऱ्यावरून परत आल्यावर बजाज त्यांना भेटले. ते महात्माजींच्या विचारसरणीकडे आकृष्ट झाले आणि आपणास पाचवा मुलगा म्हणून स्वीकारावे, अशी त्यांनी सन १९२०मध्ये गांधीजींना विनंती केली. बच्छराज यांच्याकडून लाभलेल्या संपत्तीचा त्यांनी अपरिग्रह वृत्तीने केवळ एक विश्वस्त म्हणून सांभाळ केला. सन १९०८मध्ये जमनालाल मानसेवी दंडाधिकारी झाले. पुढे सन १९१८मध्ये त्यांना रायबहादूर हा किताब मिळाला. जमनालाल हे सन १९२० सालच्या नागपूर येथील अखिल भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष झाले. काँग्रेसचे खजिनदार म्हणून त्यांनी दीर्घकाळ काम केले. त्यांनी असहकार चळवळीत भाग घेऊन आचार्य विनोबा भावे यांच्या नेतृत्वाखाली वर्धा येथे सत्याग्रह आश्रमाची स्थापना केली आणि काँग्रेसच्या ठरावानुसार रायबहादूर या उपाधीचा त्याग त्याच साली केला. सन १९२३मध्ये त्यांनी नागपूर येथे राष्ट्रध्वज सत्याग्रहाचे नेतृत्व केले. त्याबद्दल त्यांना १८ महिन्यांची शिक्षा झाली. त्याच वर्षी गांधीजीचे कार्य पुढे चालू ठेवण्यासाठी त्यांच्या अनुपस्थितीत गांधी सेवकसंघाची त्यांनी स्थापना केली. सन १९२४मध्ये ते नागपूर प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष व १९२५ मध्ये चरखा संघाचे खजिनदार होते. त्यांनी समाजसेवेसाठी अनेक संस्था स्थापन केल्या आणि अस्पृश्यतानिवारण, गोवर्धन, शिक्षणसंस्था यांसाठी भरीव आर्थिक मदत केली. अनेक संस्थांचे ते अध्यक्ष व सचिव होते. सस्ता साहित्य मंडळ याद्वारे त्यांनी राष्ट्रीय हिंदी साहित्य प्रकाशित केले. सन १९३८मध्ये अखिल भारतीय हिंदी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. काँग्रेसच्या अस्पृश्यतानिवारण मोहिमेत त्यांनी सचिव या नात्याने पुढाकार घेऊन अस्पृश्यता निर्मूलनाचा प्रचार केला आणि सन १९२८मध्ये वर्ध्याचे स्वतःच्या मालकीचे लक्ष्मीनारायण मंदिर हरिजनांना खुले केले. सन १९३०साली विलेपार्ले, मुंबई येथील मिठाच्या सत्याग्रहाचे नेतृत्व त्यांच्याकडे होते. या प्रसंगी त्यांच्या पत्नी जानकीदेवी व मुलगा कमलनयन यांनाही शिक्षा झाल्या. जमनालाल यांनी वर्ध्याजवळील सेगाव हे खेडे व तेथील जमीन गांधीना दिली. तेथे गांधीनी १९३६साली सेवाग्राम आश्रम स्थापन केला. जयपूरच्या संस्थानी प्रजेस राजकीय हक्क मिळावेत, म्हणून त्यांनी सत्याग्रह केला. त्यात त्यांना पुन्हा १९३९ मध्ये शिक्षा झाली. दुसऱ्या महायुध्दकाळात १९४१मध्ये युध्दविरोधी प्रचारांमुळे त्यांना अटक झाली. वर्धा येथे गोसेवा संघाची स्थापना त्यांनी केली होती. त्यांना रक्तदाबाचा विकार होता; त्यातच रक्तस्त्राव होऊन ते दि.११ फेब्रुवारी १९४२ रोजी निधन पावले.

त्यांच्या मृत्यूंनंतर त्यांच्या स्मरणार्थ अनेक संस्था स्थापन करण्यात आल्या. त्यांचे पुत्र रामकृष्ण यांनी जमनालाल प्रतिष्ठान स्थापन केले. त्याच्या सल्लागार समितीचे अध्यक्ष भारताचे उपराष्ट्रपती असून रामकृष्ण बजाज हे अध्यक्ष आहेत. भारतातील ग्रामीण भागात विशेष सेवा करणाऱ्या मान्यवर व्यक्ती व संस्था यांना त्याद्वारे पुरस्कार देण्यात येतात.

!! जमनालालजी बजाज यांना लेखरूपी पुण्यस्मरणाने विनम्र अभिवादन !!

**संकलन व सुलेखन –**
**श्री कृष्णकुमार आनंदी–**
**गोविंदा निकोडे गुरूजी.**
**द्वारा: श्रीगुरूदेव प्रार्थना मंदिराजवळ.**
**मु.रामनगर वॉर्ड, गडचिरोली.**
**फक्त व्हॉट्सप– ९४२३७१४८८३.**

# विद्यार्थ्यांनो,अभ्यासाची कास धरुन विकास साधा : दिगंबर फासाटे

## सेलूतील नूतन विद्यालयाचे स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न



**सेलू । प्रतिनिधी**

जीवनात सर्वार्थाने यशस्वी व्हायचे असेल, तर अभ्यासाला पर्याय नाही. विद्यार्थ्यांनी अभ्यासाची कास धरून विकास साधावा, असे प्रतिपादन नूतन विद्यालयाचे माजी विद्यार्थी तथा जय जय स्वामी समर्थ मालिकेचे दिग्दर्शक दिगंबर फासाटे यांनी केले.

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर योजने अंतर्गत मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियानांतर्गत शुक्रवारी, ९ फेब्रुवारी रोजी आयोजित नूतन विद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलनात प्रमुख पाहुणे म्हणून फासाटे बोलत होते. अध्यक्षस्थानी नूतन विद्यालय शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. सत्यनारायण लोया होते. प्रमुख पाहुणे सिनेअभिनेते अनुज ठाकरे संस्थेचे सचिव प्राचार्य डॉ.विनायकराव कोठेकर, दत्तराव पावडे, प्रभारी मुख्याध्यापक संतोष पाटील, पर्यवेक्षक के.के.देशपांडे, डी.डी.सोन्नेकर, पालक शिक्षक संघाच्या उपाध्यक्ष आरती पांडव, विद्यार्थी प्रतिनिधी प्रतिक ठाकर, हिमांशी जैन यांची व्यासपीठावर उपस्थिती होती.अनुज ठाकरे यांनी मनोगतातून शालेय जीवनात विद्यार्थ्यांनी मोठ्यांचा व शिक्षकांचा सन्मान ठेवला पाहिजे. भावी वाटचालीसाठी त्यांचे मार्गदर्शन महत्त्वपूर्ण ठरते, असे नमूद केले. अध्यक्षीय भाषणात डॉ.लोया यांनी शरीरासोबतच मन सुंदर ठेवण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे, असे नमूद केले.

डॉ.लोया यांच्या हस्ते प्रमुख पाहुण्यांचा शाल, श्रीफळ, पुष्पहार, अमृतायन स्मरणिका व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. विविध स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. प्रास्ताविक संतोष पाटील यांनी केले. प्रारंभी मानसी दलाल, सिध्दी रोडगे या विद्यार्थिनींनी जात्यावर ओवी गाऊन, तर राजनंदिनी निकम, पल्लवी गजमल, सिध्दांत जवादे या विद्यार्थ्यांनी काव्यरूपाने पाहुण्यांचा परिचय दिला. किरण देशपांडे यांनी अहवाल सादर केला. सच्चिदानंद डाखोरे, गिरीश दीक्षित आणि विद्यार्थ्यांनी अशोक लिंबेकर रचित ' माझी शाळा सुंदर शाळा ' गीत सादर केले. सूत्रसंचालन वैष्णवी पिंपळगावकर, हर्ष पिंगळे यांनी केले. डॉ.काशिनाथ पल्लेवाड, शिल्पा बरडे, गणेश माळवे, गोपाल आम्ले यांनी प्रमाणपत्र वितरण संचालन केले. देविदास सोन्नेकर यांनी आभार मानले. कार्यक्रमाला सुधाकर फासाटे, मनीष आजगावकर, मधुकर फासाटे, रामेश्वर व परमेश्वर फासाटे, वैभव जाधव, पवन फासाटे, ईश्वर फासाटे यांच्यासह विद्यार्थी, शिक्षक, पालकांची मोठी उपस्थिती होती. यशस्वीतेसाठी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# अखिल भारतीय ग्राहक पंचायतची कार्यकारणी जाहीर

## तालुकाध्यक्षपदी मंचक जगताप सचिव पदी ज्ञानेश्वर रोकडे यांची निवड

**जिंतूर । प्रतिनिधी**

तालुक्यातील अखिल भारतीय ग्राहक पंचायतची बैठक शासकीय विश्रामगृह जिंतूर येथे ८ फेब्रुवारी रोजी घेण्यात आली त्या बैठकीत नूतन कार्यकारिणीची निवड डॉ. विलास मोरे प्रांत अध्यक्ष देवगिरी यांच्या वतीने बिनविरोध जाहीर करण्यात आली आहे.कार्यक्रमाचे अध्यक्ष गुलाबराव शिंदे ,प्रमुख पाहुणे डॉ विलास मोरे ,शंकरराव बचाटे ,गंगाधरराव कान्हेकर, नागोराव देशमुख, सुदाम कुटे, आशाताई खिल्लारे, दिलीप देवकर ,महेश देशमुख आदींची उपस्थिती होती.



डॉ.विलास मोरे यांनी मार्गदर्शन करताना प्रत्येक नागरिक हा ग्राहक आहे. जन्मल्यापासून ते मरेपर्यंत आपल्या गरजा भागविण्यासाठी आपण दररोज घेत असलेल्या वस्तू किंवा सेवा ग्राहक रूपानेच खरेदी करत असतो. आपली फसवणूक झाल्यावर आपण अखिल भारतीय ग्राहक पंचायत मार्फत मार्गदर्शन घेऊन याप्रकरणी न्याय मागू शकतो. सदरील कार्यकारणी खालील प्रमाणे आहे .मार्गदर्शक= चंद्रकांत गवळी अध्यक्ष= मंचक देशमुख उपाध्यक्ष= सचिन रायपत्रीवार उपाध्यक्ष= काशिनाथ घुगे सचिव= ज्ञानेश्वर रोकडे सहसचिव= माणिक शिंदे सहसचिव= प्राचार्य राहुल वाहुळे कोषाध्यक्ष= शेख गफार अफजल शेख सहकोषाध्यक्ष= किसनराव खाडे संघटक =बालाजी शिंदे सहसंघटक= प्रल्हाद टाकरस सदस्य= मधुकरराव गोरे, विष्णू चव्हाण, माणिक शिंदे, महिला सदस्य= सुनिता कांबळे ,अर्चना बांडे बामणी शाखा अध्यक्ष =शंकरराव जाधव यांची निवड करण्यात आली आहे. वरील सर्व मान्यवरांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मंचक देशमुख यांनी केली. आभार प्रदर्शन चंद्रकांत गवळी यांनी केली.



**दनांक ८ फेब्रुवारी २०२४ रोजी राधेकृष्ण बहुद्देशीय सेवाभावी संस्था संचलित राधे कृष्ण गोशाळा पशु निवारा केंद्र यांच्या वतीने रामनगर परिसर परभणी येथील बिमार आसलेल्या कुत्र्याच्या पोटाला असलेल्या कॅन्सरच्या गाठीचे ऑपरेशन करून त्यांच्यावर उपचार करण्यात आला या कार्यात डॉ पंडित राठोड यांनी ऑपरेशन केले त्यांना मदत करण्यासाठी पशु निवारा केंद्राचे आकाश काकडे वशिष्ठ काकडे प्रताप चव्हाण रविराज ढगे यांनी मदत केली अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष कृष्णकुमार रुस्तुमराव रसाळ यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली.**

# कुपटा येथील ज्ञानोपासक विद्यालयाचे यश

**कौसडी । प्रतिनिधी**

जिंतूर तालुक्यातील कौसडी येथून जवळ असलेल्या कुपटा (ता.सेलू )येथील ज्ञानोपासक विद्यालयाचे छचचड परीक्षामध्ये घवघवीत यश संपादन केले. या परीक्षेमध्ये विद्यालयातील एकूण १३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. त्याबद्दल विद्यालयाच्या वतीने विद्यार्थ्यांचा व मार्गदर्शक शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. यावेळी मार्गदर्शक शिक्षक जी . ई .गोरे, ए. आर. शिंदे, एस. ए.भोसले. पी. एस. काठुले .सर्व विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे विद्यालयाचे मुख्याध्यापक आर. पी. तलवारे , ज्येष्ठ शिक्षक सी. के .चरचरे. एस. जी. शेख, एस.पी.इंगळे.



डी.के.कपाटे. एस .टी .पाडाळसे, एस. एफ. पवार , आर. एम .राऊत , जे. पी. शिंदे, ए .यु. चट्टे, आर. बी. घुगे, एस .ए. पवार,व शिक्षकेतर कर्मचारी एस. आर .घोडके एस. सी .उपलवाड , एल. बी. राऊत, जी. बी.गिरी , इत्यादींनी यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले ..

# मतदार संघातील गावात होणार ४६७ कि.मी.च्या मातोश्री ग्राम समृद्धी योजनेतुन पाणंद रस्त्यांची कामे

## क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री संजय बनसोडे यांची माहिती

**उदगीर** –उदगीर ग्रामीण भागातील शेतकऱ्यांची जिवनवाहिनी असलेल्या पाणंद रस्त्यांना मंजुरी देवून दिड ते दोन कि.मी. पर्यंतचे रस्ते व त्यांचे खडीकरण करण्यासाठी राज्य शासनाच्या नियोजन विभाग रोजगार हमी योजना मातोश्री ग्राम समृद्धी शेत / पाणंद रस्ते योजनेंतर्गंत सन २०२३–२४ या वर्षातीलरस्त्यांच्या कामांना मंजुरी देण्यात आली असुन मतदार संघात ४६७ किलो मीटरचे रस्ते होणार असल्याची माहिती राज्याचे क्रीडा व युवक कल्याण, बंदरे तथा परभणीचे पालकमंत्री संजय बनसोडे यांनी दिली आहे.

मातोश्री ग्रामसमृद्धी शेत / पाणंद रस्ते योजनेअंतर्गत उदगीर जळकोट तालुक्यातील विविध गावामध्ये ०.५० कि.मी., १.०० कि.मी., १.५ कि.मी.,१.८० कि.मी. , २ कि.मी. , २.५० किलो मिटरचे शेत पानंद रस्ते गावांमध्ये मंजूर करण्यात आले असून यामध्ये शेत पाणंद रस्त्याची कामे पावसाळ्यात करणे अडचणीचे असते त्यामुळे त्या कामांना खरीप हंगामाच्या काढणीनंतर सुरुवात केल्यास सदर पाणंद रस्त्याचे काम न थांबता पूर्ण करता येऊ शकतात ही बाब विचारात घेऊन ज्या ग्रामपंचायतीने पुढाकार घेऊन आपल्या गावातील शेत पानंद रस्ते पूर्ण करण्याची तयारी दाखवली आहे अशा गावातील शेत पाणंद रस्त्यांना शासनाने मंजुरी दिली असुन यासाठी या भागाचे आमदार तथा क्रीडा मंत्री संजय बनसोडे यांनी मतदार संघातील आवश्यक गावांसाठी पाठपुरावा केला होता.यामध्ये उदगीर तालुक्यातील लोणी, तोंडार, गुरधाळ, कल्लुर, एकुर्कारोड, हंगरगा कु., शंभुउमरगा, तोंडार, देऊळवाडी, अवलकोंडा, बनशेळकी, उमरगा मन्ना, सुकणी, मोर्तळवाडी, चिमाचीवाडी, डिग्रस, करडखेल, सताळा, लोहारा, सताळा बु., भाकसखेडा, देवर्जन, करखेली, दावणगाव, गुडसुर, अरसनाळ, धोंडीहिप्परगा, बेलसकरगा, वाढवणा बु., डोंगरशेळकी, करवंदी, नळगीर, अवलकोंडा, दावणगाव, शेकापुर, मोर्तळवाडी (न), तोगरी, बनशेळकी,अरसनाळ,



नेत्रगाव, मल्लापुर, शेल्हाळ, नागलगाव, पिंपरी, जकनाळ, हैबतपुर, हिप्परगा डा., सुमठाणा, एकुर्का, , रुद्रवाडी, गुडसुर, सय्यदपुर, तिवटग्याळ, रावणगाव, मलकापूर, भाकसखेडा, कोदळी, एकुर्कारोड, नागलगाव, धडकनाळ, कुमदाळ हेर, हिप्परगा डा., डाऊळ, गुडसुर, तोगरी, खेर्डा, हकनकवाडी, रावणगाव,शेकापुरवाडी, कल्लुर, इस्मालपुर, हिप्परगा डा., डाऊळ हि., डाऊळ, गंगापुर, देवर्जन, टाकळी, कुमदाळ (हेर), हंगरगा कु., बनशेळकी, बोरगाव, धोंडिहिप्परगा, कोदळी, वाढवणा खु., गुडसुर, जकनाळ, हकनकवाडी, खेर्डा, जानापुर, हंडरगुळी, कल्लुर, तादलापुर, हाळी, देऊळवाडी, चोंडी, चिमाचीवाडी, देवर्जन रोड, नागलगाव, शेकापुर, वाढवणा खु., कल्लुर, शिरोळ, कासराळ, आदी तर जळकोट तालुक्यातील कोळनुर, मेवापुर, अतनुर, माळहिप्परगा, धामणगाव, सोरगा, गुत्ती, लाळी बु., मंगरूळ, फकरु तांडा, चतरु तांडा, घोणसी, सोनवळा, बोरगाव, येवरी, सुल्लाळी, मंगरूळ, जगळपुर, जळकोट, हळद वाढवणा, होकर्णा, शिवाजीनगर तांडा, चिंचोली, गुत्ती, वांजरवाडा, येलदरा, डोमगाव, लाळी बु., उमरगा रे., बोरगाव, तिरुका, मरसांगवी, शिवाजीनगर, तिरुका, उमरगा रेतु, केकतसिंदगी, उमरदरा, चेरा, गुत्ती, पाटोदा बु., जंगमवाडी, जिरगा, शेलदरा, हळदवाढवणा, रावणकोळा, हावरगा, चेरा, गुत्ती, वांजरवाडी हा., धामणगाव, सुल्लाळी, येवरी, अतनुर, मंगरुळ, होकर्णा, आदी गावामध्ये शासनाच्या नियोजन विभागातुन सदर पाणंद रस्त्यांना मंजुरी देण्यात आली आहे. मातोश्री ग्रामसमृध्दी शेत/पाणंद रस्ते योजनेअंतर्गत उदगीर व जळकोट तालुक्यातील पाणंद रस्त्यांना मंजुरी देण्यात आली आहे. या पाणंद रस्त्यामुळे शेतकऱ्यांना आपल्या शेताकडे जाण्यासाठी सोईचे होईल आणि शेतातील मालवाहतूक करण्यासाठी मदत होणार असल्यामुळे उदगीर व जळकोट तालुक्यातील शेतकऱ्यांनी क्रीडा मंत्री संजय बनसोडे यांचे अभिनंदन करुन आभार व्यक्त केले आहेत.

सह्याद्रीचा राखणदार



# बाभळगाव मंडळात रब्बी ज्वारी सह पिण्याच्या पाण्याची गंभिर परिस्थिती ; चारी ला पाणी सोडण्याची मागणी



**पाथरी । प्रतिनिधी**

बाभळगाव मंडळात अत्यल्प पाऊस झाल्याने खरीप पिके हातची गेली या मंडळाला शासनाने दुष्काळी मंडळ म्हणून जाहिर केलेले आहे. नोव्हेंबर महिण्यात शेवटी जायकवाडीचे पाणी आवर्तन मिळाल्याने डिसेंबर च्या पहिल्या, दुस-या आठवड्यात रब्बी पेरणी झाली खरी परंतु आता ज्वारी आणि अन्य पिके करपत चालली असून पिण्याच्या पाण्याची गंभीर स्थिती निर्माण होत असल्याने जायकवाडीच्या पाथरी उपविभाग क्र. ६ च्या चारी क्र बी ५९ मधून त्वरीत पाणी सोडण्याची मागणी शेतकरी आणि सामान्य जनतेतून होत आहे.

निसर्गाच्या लहरीपणाचा नेहमीच शेती पिकांना फटका बसत आला आहे. यात कधी अतिवृष्टी तर कधी आवकाळी पाऊस तर कधी कोरडा दुष्काळ या वर्षी कोरड्या दुष्ळाचा सामना बाभळगाव मंडळातील अनेक गावे करत आहेत. शेतातील ज्वारीच्या पिकाला जायकवाडीचे पाणी मिळाले तर किमान जनावरांना चारा तरी मिळेल कारण या पाण्यावर ज्वारीच्या कनसात दाने तर भरणार नाहीत परंतू जनावरांच्या चा-याचा प्रश्न काही अंशी सुटून पिण्याच्या पाण्याचा प्रश्न काही अंशी सुटू शकतो असे शेतकरी सांगत आहेत. बी ५९ या चारी वर जवळपास विस,बाविस गावांना पाणी मिळते एवढ्या मोठ्या संखेने गावे असतांना अधिकारी मात्र तारीख पे तारीख देत असल्याने शेतक-यां मधून संतापाची भावना व्यक्त होत आहे. जायकवाडी कालवा सल्लागार समितीची बैठक छत्रपती संभाजीनगर येथे पालकमंत्री ना. संदिपान भुमरे यांच्या अध्यक्षते खाली सात जानेवारी रोजी संपन्न झाली होती. त्यात जायवाडीच्या पाण्याचा आढावा घेऊन फेब्रुवारी, एप्रिल, आणि मे महिण्यात रब्बी साठी कालव्या व्दारे पाणी पाळी देण्याचे निश्चित झाल्याचे या समितीचे सदस्य तथा योगेश्वरी शुगर्सचे चेअरमन माजलगावचे माजी आ आर टी देशमुख यांनी सांगितले होते. त्याच बरोबर गोदावरी नदी वरील सर्व उच्च पातळी बंधा-यांना ही पाणी सोडले जाणार असल्याचे या बैठकीत ठरले होते. परवा कालवा सल्लागार समितीचे सदस्य माजी मंत्री आ राजेश टोपे यांनी एक व्हिडीओ तयार करत या आवर्तनाच्या नियोजना विषयी माहिती देत सोशल मिडियात व्हारल केला आहे. त्या मुळे हे आवर्तन मिळणार असा विश्वास शेतकरी सामान्य माणसात निर्माण झाला असला तरी बी ५९ चारी वर पाथरी तालुक्याचे मोठे क्षेत्र ओलिता खाली येत असल्याने या भागात किमान विस,पंचविस दिवस चारी ला पाणी ठेवावे लागते. आणि पाणी आवर्तन २६ फेब्रुवारी पर्यंतच असल्याचे सांगितले जात असल्याने एवढे क्षेत्र कमी दिवसात कसे ओलित होईल असा प्रश्न शेतकरी,ग्रामस्थ उपस्थित करत आहेत. त्या मुळे बी ५९ या चारीला त्वरीत पाणी नाही सोडल्यास या भागातील शेतकरी रस्त्यावर उतरून तिव्र आंदोलन करावे लागेल असे उघडपणे बोलत आहेत.

## प्रभू कृपा विद्यालयात मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा संपन्न

**कौसडी । प्रतिनिधी**

जिंतूर तालुक्यातील कौसडी येथून जवळ असलेल्या वाघी-बोबळे येथील प्रभू कृपया विद्यालयात मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर व स्वच्छ शाळा या अभियानांतर्गत महावाचन चळवळ उत्सव घेण्यात आला. या कार्यक्रमाचे उद्दिष्टे असे होते की इयत्ता तिसरी पर्यंतच्या विद्यार्थ्याला वाचता यावे आणि इयत्ता आठवी मधील विद्यार्थ्यांना शिकण्यासाठी उत्साहित किंवा प्रेरित करावे इयत्ता तिसरी मधील मुले ३० टक्के पेक्षा जास्त मुले लहान मजकूर वाचू शकत नाही आणि इयत्ता आठवी पर्यंत ४३ टक्के मुले वाचू शकतात त्यातून त्यांना मात्र भाषेत पुस्तके उपलब्ध करून देणे व वाचनाची गोळी त्यांच्यामध्ये निर्माण करणे हा या कार्यक्रमाचे मुख्य उद्देश आहे.या कार्यक्रमाची अंमलबजावणी यांनी साप्ताहिक शनिवारी अशी करण्यात आली



त्यामध्ये गोष्टीचा शनिवार दप्तर मुक्त शाळा विविध थीम देऊन लिखाण काम व महावाचन घेऊन त्यांना अभ्यासा प्रति रुची निर्माण करणे हा होता.शाळेचे मुख्याध्यापक संतोष साखरे यांच्या मार्गदर्शनानुसार कार्यक्रमाची व्यवस्था नवनाथ पांचाळ यांच्यावर देण्यात आली होती .साप्ताहिक मावाचन कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी धुळे, पाटील, ठोंबरे,साळवे, भिसे, वसमतकरयांनी परिश्रम घेतले होते. मावाचन विद्यार्थी कमिटी स्थापना करण्यात आली. या कमिटी मध्ये कमिटी प्रमुख विकास कनकुटे सदस्य प्रभाकर तुपकरी अफरोज शहा व युवराज साखरे यांची निवड करण्यात आली.

## शासकीय रेखाकला परीक्षेत नितीन माध्यमिक विद्यालयाचे यश

**सेलू । प्रतिनिधी**

सेलू / महाराष्ट्र राज्य कला संचालनालय मुंबई यांच्या वतीने घेतल्या जाणाऱ्या एलिमेंटरी व इंटरमिजिएट ग्रेड चित्रकला (शासकीय रेखाकला) या दोन्ही परीक्षेत नितीन माध्यमिक विद्यालय आहेर बोरगावचा निकाल शंभर टक्के लागला असून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी या परीक्षेत घवघवीत हे संपादन केले आहे.

यामध्ये कु.किर्ती हरीभाऊ जाधव या विद्यार्थ्यांनीने - ग्रेड (श्रेणी) प्राप्त केला असून, इ ग्रेड मध्ये कु. स्वप्नाली शरद पवार व सार्थक राजेश गजमल हे दोन विद्यार्थी तर उर्वरित उ श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत.

इंटरमिजिएट ग्रेड चित्रकला परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थ्यांना त्यांच्या ग्रेड नुसार ग्रेड A=7, ग्रेड B=5 तर ग्रेड C=3 गुण इयत्ता दहावीच्या (एस.एस.सी) बोर्ड परीक्षेत वाढीव गुण मिळणार आहेत. व या गुणांमुळे




त्यांच्या इयत्ता दहावीच्या पर्सेंटेज मध्ये वाढ होणार आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्थेचे अध्यक्ष मा.श्री राजेंद्र काका लहाने, मुख्याध्यापक सर्जेराव लहाने,कलाशिक्षक संतोष ताल्डे तसेच विद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी वृंदानी केले.

## विषबाधित रुग्णांना दर्जेदार आरोग्य सेवा द्या-आमदार शामसुंदर शिंदे



**लोहा । प्रतिनिधी**

लोहा तालुक्यातील कोष्टवाडी येथे बाळूमामाच्या मेंढ्या कार्यक्रमात एकादशीच्या दिवसी भगर व आमटी खाल्याने जवळपास दीड ते दोन हजार भाविक भक्तांना विषबाधा झाल्याची दुर्देवी घटना दिनांक ६ फेब्रुवारी रोजी सायंकाळी घडली होती, विषबाधित हजारो रुग्णांना लोहा उपजिल्हा रुग्णालय, अहमदपूर शासकीय रुग्णालय, डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय रुग्णालय विष्णुपुरी, पालम शासकीय रुग्णालय, सावरगाव आरोग्य केंद्र व खाजगी दवाखान्यांमध्ये उपचारासाठी विषबाधित रुग्णांना दाखल करण्यात आले होते, काल दि. ८ फेब्रु गुरुवारी लोहा कंधार मतदार संघाचे लोकप्रिय, कर्तव्यदक्ष आमदार शामसुंदर शिंदे यांनी विषबाधित रुग्णांची डॉ. शंकराव चव्हाण विष्णुपुरी रुग्णालय, लोहा येथील उपजिल्हा रुग्णालय, सावरगाव येथील आरोग्य उपकेंद्र, व कोष्टवाडी येथील आरोग्य कॅम्प येथे भेट घेऊन विषबाधित रुग्णांना व नातेवाईकांना धीर दिला व अस्तेवायीकपणे विचारपूस केली व लोहा उपजिल्हा रुग्णालय येथे व सावरगाव येथील आरोग्य केंद्रात दाखल विषबाधित रुग्णांची आमदार शामसुंदर शिंदे यांनी भेट घेऊन अस्तवाईकपणे विचारपूस केली व संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्यांना विषबाधित रुग्णांना वेळेवर व दर्जेदार औषध उपचार करण्यासाठी आमदार शामसुंदर शिंदे यांनी संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्यांना निर्देश दिले,विष बाधित रुग्णांच्या वैद्यकीय सेवेत कसूर करणाऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्यांची कदापि गय केली जाणार नसून विष बाधित रुग्णांनी व नातेवाईकांना काही अडचणी झाल्यास न घाबरता मला कधीही फोन करा मी विषबाधित रुग्णांच्या अडी अडचणीचे निरासन करण्यासाठी सदैव कटिबद्ध असल्याचे यावेळी आमदार शामसुंदर शिंदे यांनी विषबाधित रुग्णांना व नातेवाईकांना आश्वासन देऊन धीर दिला, यावेळी डॉ. शंकराव चव्हाण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. निळकंठ भोसीकर ,माजी जिल्हा परिषद सदस्य तथा कृषी उत्पन्न बाजार समिती लोह्याचे संचालक चंद्रसेन पाटील, खरेदी विक्री संघाचे उपसभापती श्याम अण्णा पवार ,डॉ. संजय पेरके, डॉ. विद्या बापट, डॉ. भालेराव मॅडम, डॉ. सोमेश मारावार, नायब तहसीलदार अशोक मोकले, मंडळ अधिकारी शेख, तलाठी पुजा गाडे, शेकापचे तालुकाध्यक्ष नागेश हिलाल, संचालक सुधाकर सातपुते, जगदीश पाटील कदम सह वैद्यकीय अधिकारी ,कर्मचारी, पदाधिकारी उपस्थित होते, यावेळी यावेळी वैद्यकीय अधिकाऱ्यांनी विषबाधित सर्व रुग्णांची तब्येत स्थिर असून काळजी करण्याचे कारण नसल्याचे व विषबाधित सर्व रुग्णांना दर्जेदार वैद्यकीय सुविधा मिळत असल्याचे वैद्यकीय अधिकाऱ्यांनी यावेळी आमदार श्यामसुंदर शिंदे यांना सांगितले.

## बोरी येथे आनंद नगरी कार्यक्रमात विद्यार्थ्यांच्या खाद्यपदार्थांना मिळाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**कौसडी । प्रतिनिधी**

बोरी- येथील जिल्हा परिषद केंद्रीय कन्या शाळेत आयोजित केलेल्या आनंदनगरी कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी विविध खाद्यपदार्थांचे स्टॉल मांडले होते. या खाद्यपदार्थांचा शिक्षक शिक्षिका पालक व विद्यार्थ्यांनी सविनय आस्वाद घेतला घेत उत्स्फूर्त प्रतिसाद दिल्याचे दिसून आले.

जिंतूर तालुक्यातील बोरी येथे जिल्हा परिषद केंद्रीय कन्या शाळेत बुधवार दिनांक ७ फेब्रुवारी रोजी आनंदनगरी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमात विद्यार्थी व पालकांनी स्वयंस्फूर्तीने सक्रिय सहभाग नोंदवला पारंपारिक व आधुनिक खाद्यपदार्थांचे स्टॉल मांडण्यात आले होते शाळेच्या वतीने मंडप पाण्याची व्यवस्था स्टॉलची व्यवस्था आधी सुव्यवस्थितरित्या करण्यात आली होती. विद्यार्थ्यांनी मांडलेल्या प्रत्येक स्टॉलवर गर्दी पाहायला मिळत होती. उपक्रमाचे उत्कृष्टरित्या आयोजन केल्याबद्दल गावातील नागरिकांनी व पालकांनी शाळेचे शिक्षक व विद्यार्थ्यांचे कौतुक केले.विद्यार्थ्यांमध्ये काही विशेष गुण असतात. पुस्तकी ज्ञानासोबत विद्यार्थ्यांमध्ये असलेले सुप्त गुण व व्यावहारिक ज्ञान यांना अशा उपक्रमातून चालना मिळते, असे शाळेचे शिक्षक मिलिंद माटे यांनी सांगितले.



## दुसऱ्या आयतोबांना 'राष्ट्रवादी' मिळाली

## निवडणूक आयोग भारताचा नव्हे मोदी-शहांचा ;ठाकरे गटाचा मुखपत्रातून हल्लाबोल

**मुंबई**-शरद पवार यांनी प्रचंड मेहनतीने उभा केलेला राष्ट्रवादी पक्ष निवडणूक आयोगाने त्यांच्याच पक्षातील फुटीर आयतोबा अजित पवार यांच्या हवाली केला असे म्हणत ठाकरे गटाने मुखपत्रातून हल्लाबोल केला आहे. तसेच 'शिवसेना', 'राष्ट्रवादी काँग्रेस' सारख्या महाराष्ट्र अस्मिता जपणाऱ्या मराठी माणसांचे पक्ष फोडून महाराष्ट्राच्या स्वाभिमानाची पुरती वाट लावण्याची गॅरंटी मोदी-शहांच्या राजकारणाने दिली असल्याची टीकाही ठाकरे गटाने केली आहे.निवडणूक आयोग हा 'भारता'चा राहिलेला नसून तो मोदी-शहांचा झाला आहे. शरद पवार यांनी प्रचंड मेहनतीने उभा केलेला राष्ट्रवादी पक्ष निवडणूक आयोगाने त्यांच्याच पक्षातील फुटीर आयतोबा अजित पवार यांच्या हवाली केला. याच पद्धतीने हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी निर्माण केलेली शिवसेना 'आयतोबा' एकनाथ मिंधे यांच्या हाती सोपवली गेली. म्हणजे बेइमानी करून, भ्रष्टाचार करून भाजपच्या गोटात या, आम्ही तुमचा 'पक्ष' तुमच्या ताब्यात देतो, हीच 'मोदी गॅरंटी' आहे व लोकशाहीसाठी तो सगळ्यात मोठा धोका आहे असे ठाकरे गटाने म्हंटले आहे.तसेच नॅशनॅलिस्ट काँग्रेस पार्टी म्हणजे 'नॅशनॅलिस्ट करप्ट पार्टी' अशी टीका मोदी-शहांनी केली होती. तीच तथाकथित 'करप्ट' पार्टी मोदी-शहांच्या गॅरंटीने आता अजित पवारांना सोपवली. अजित पवारांच्या ७० हजार कोटींच्या सिंचन घोटाळ्याचा बॉम्ब स्वतः पंतप्रधान मोदी यांनी फोडला होता. त्याच अजित पवारांना 'राष्ट्रवादी' व घड्याळ चिन्ह मिळताच मोदी-शहा-फडणवीस-बावनकुळे वगैरे भाजप कुळांनी अजित पवारांचे अभिनंदन करून एकमेकांना पेढे भरवून आनंद साजरा केला. यापेक्षा ढोंग आणि वैचारिक व्यभिचार तो कोणता? असा खोचक सवालही ठाकरे गटाने उपस्थित केला आहे.उद्धव ठाकरे, शरद पवार यांचे पक्ष जनमानसात रुजलेले आहेत. निवडणूक आयोगाच्या कागदी निर्णयाने त्यांच्या अस्तित्वावर फरक पडणार नाही. निकालामागे 'अदृश्य शक्ती' आहे, असे श्री. शरद पवार म्हणाले. ही अदृश्य शक्ती नसून महाराष्ट्राच्या स्वाभिमानी मानेवर बसलेली भुताटकी आहे. या भुताटकीस कायमचे गाडावेच लागेल. शिवसेना असे अनेक घाव झेलून उभी आहे. उद्धव ठाकरे यांच्या महाराष्ट्र दौऱ्यांनी झंझावात निर्माण केला आहे. शरद पवारही अनेक वादळे व संकटे झेलून उभेच आहेत. निवडणूक आयोग महाराष्ट्राचा हा उत्साह कसा संपवणार? मोदी-शहांची अप्रामाणिक गॅरंटी आणि निवडणूक आयोगाची घटनाबाह्य झुंडशाही यांचा पराभव महाराष्ट्राची जनता केल्याशिवाय राहणार नाही, असा रोखठोक इशारा देखील ठाकरे गटाने दिला आहे.

## आमदार किशोर जोरगेवार यांच्या संकल्पनेतून भव्य विदर्भ राज्यस्तरिय बॉडी बिल्डींग स्पर्धा

**चंद्रपूर**-आमदार किशोर जोरगेवार यांच्या संकल्पनेतून श्री माता महाकाली क्रिडा स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या अंतर्गत उद्या रविवारी चंद्रपूर डिस्ट्रिक्ट बॉडी बिल्डिंग अँड फिटनेस स्पोर्ट्स असोसिएशन चंद्रपूर यांच्या सहकार्याने चंद्रपूर महानगर पालिका पटांगणावर भव्य विदर्भ राज्यस्तरिय बॉडी बिल्डींग अंजिक्यपद स्पर्धा पार पडणार आहे. मुंबईचे प्रसिध्द बॉडी बिल्डर निलेश दगडे हे या स्पर्धेचे विशेष आकर्षण असणार आहे.

यंदाही आमदार किशोर जोरगेवार यांच्या संकल्पनेतून चंद्रपूरात श्री माता महाकाली क्रिडा महोत्सवाला सुरवात करण्यात आली आहे. या अंतर्गत नुकतेच क्रिकेट सामने आणि कबड्डी स्पर्धा घेण्यात आली आहे. तर उद्या रविवारी गांधी चौक येथील महानगरपालिकेच्या पटांगणावर भव्य विदर्भ राज्यस्तरीय बॉडी बिल्डींग अंजिक्यपद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. सांयकाळी ५ वाजता या सामान्यांना सुरवात होणार आहे. या स्पर्धेत नामवंत बॉडी बिल्डर सहभागी होणार आहे. यंदाचे हे तिसरे वर्ष असून यंदा मुंबईचे प्रसिध्द बॉडी बिल्डर निलेश दगडे यांची विशेष उपस्थिती राहणार आहे. या स्पर्धेत आमदार श्री ठरणा-या बॉडी बिल्डरला ५१ हजार १११ रुपये व ट्रॉफी देण्यात येणार आहे. तर बेस्ट पोझरसाठी ३१ हजार १११ रुपये ट्रॉफी , बेस्ट इम्प्रुव्हसाठी २१ हजार १११ रुपये ट्रॉफी , असे एकुन दोन लक्ष ४६ हजार ६४८ रुपयांचे पारितोषिक वितरित केले जाणार आहे. या स्पर्धेला आमदार किशोर जोरगेवार यांचीही प्रामुख्याने उपस्थिती राहणार असुन नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहत स्पर्धेचा आनंद घ्यावा असे आवाहण आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांसाठी पहिल्यांदाच विज्ञान प्रदर्शनीचे आयोजन

## भामरागड प्रकल्प कार्यालयाचा पुढाकार;विद्यार्थ्यांचा उत्तम प्रतिसाद

**भामरागड | प्रतिनिधी**

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय,भामरागड अंतर्गत समाविष्ठ भामरागड व एटापल्ली तालुक्यातील शासकीय व अनुदानित आश्रम शाळेतील विध्यार्थ्यांकरिता प्रकल्प अधिकारी आदित्य जिवने यांच्या अध्यक्षतेखाली विज्ञान प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले.विशेष म्हणजे पहिल्यांदाच आश्रम शाळेतील विध्यार्थ्यांकरीता विज्ञान प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले असून दोन्ही तालुक्यातील २४ आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांनी ४८ मॉडेल्स सादर केले.

सन २०२२-२३ या वित्तीय वर्षातील केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजनेअंतर्गत मंजूर असलेल्या योजनेतून भामरागड प्रकल्प कार्यालय अंतर्गत येत असलेल्या भामरागड,एटापल्ली या दोन तालुक्यातील ०८ शासकीय व १६ अनुदानित आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांकरिता शुक्रवार (९ फेब्रुवारी) रोजी आदिवासी मुलांचे शासकीय वसतिगृह,एटापल्ली येथे विज्ञान प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले होते. आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांसाठी 'आदिवासी समाज व जैवविविधता संवर्धन' हा विषय देण्यात आला होता. या विषयावर आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांनी प्राथमिक व माध्यमिक असे दोन गट मिळून तब्बल ४८ मॉडेल्स सादर केले होते.सहाय्यक जिल्हाधिकारी व प्रकल्प अधिकारी म्हणून आदित्य जिवने यांनी पदभार स्वीकारल्यावर पहिल्यांदाच आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांसाठी विज्ञान प्रदर्शनीचे आयोजन केले. विद्यार्थ्यांनी देखील दिलेल्या विषयावर उत्तम असे मॉडेल्स सादर करत चांगला



प्रतिसाद दिला. यावेळी पर्यावरण व जैवविविधता बद्दलची काळजी या प्रदर्शनामध्ये प्रखरतेने दिसून आली.विज्ञान प्रदर्शनात प्राथमिक गटातून लोक बिरादरी अनुदानित आश्रम शाळा, हेमलकसाने प्रथम,भगवंतराव आश्रम शाळा, एटापल्लीने द्वितीय तर संत मानवदयाल आश्रम शाळा,चिचोडाने तृतीय क्रमांक पटकाविले.तर माध्यमिक गटातून शासकीय माध्यमिक आश्रम शाळा,तोडसाने प्रथम, लोक बिरादरी आश्रम शाळा हेमलकसाने द्वितीय आणि भगवंतराव माध्यमिक तथा उच्च माध्यमिक आश्रम शाळा एटापल्लीने तृतीय क्रमांक पटकाविले.सदर प्रदर्शनीचे गुणांकन राहुल ढबाले,प्राध्यापक कु.पी एन उईके,गृहापाल यांनी केले.विज्ञान प्रदर्शनी मध्ये प्रथम,द्वितीय आणि तृतीय क्रमांक पटकाविणाऱ्या शाळेतील विध्यार्थ्यांना प्रकल्प अधिकारी आदित्य जिवने यांच्याहस्ते मानचिन्ह, प्रमाणपत्र व डॉक्टर एपीजे अब्दुल कलाम यांचे आत्मचरित्र असलेले अग्निपंख हे पुस्तक देण्यात आले.यावेळी सहाय्यक प्रकल्प अधिकारी रोशना चव्हाण,कार्यालयीन अधीक्षक मनोज सयाम तसेच आदी कर्मचारी, शिक्षक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ओबीसी समाजामध्ये व्देष पसरविण्याचे काम काँग्रेसनेच केले-डॉ.अंकुश आगलावे

## राहुल गांधीनी ओबीसी समाजाबद्दल केलेल्या बेताल वक्तव्याचा निषेध

**वरोरा | प्रतिनिधी**

राहुल गांधी यांनी ओबीसी समाजाबद्दल बेताल वक्तव्य करून ओबीसी समाजाच्या भावना दुखावल्या बद्दल भाजपा ओबीसी मोर्चा जिल्हा चंद्रपूर चे जिल्हाध्यक्ष डॉ. अंकुश आगलावे यांनी उपविभागीय अधिकारी, वरोरा यांना कार्यवाही बाबत निवेदन दिले.




काँग्रेसचे खासदार राहुल गांधीनी ओबीसी समाजाचा अपमान करून अभद्र टिपणी करून समस्त ओबीसी समाजाचा अपमान केला आहे. देशाचे पंतप्रधान हे तेली जातीत जन्माला आले नसून सामान्य वर्गात जन्मास आले आहे असे उद्गार राहुल गांधी यांनी काढले आहे.राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी हे ओबीसी मध्ये जन्माला आलेले नसल्याचा दावा करून समस्त ओबीसी समाजाचा अत्यंत संतापजनक असा अपमान केला आहे. तेली समाजात जन्माला आलेली माणसे तेली समाजाचे नाहीत हे राहुल गांधीचे बुनबुडाचे वक्तव्य आहे. काँग्रेस तेली समाजाचा ओबीसी पासून वेगळे करण्याचा आणि ओबीसी चा एक वर्ग कमकुवत करण्याचा प्रयत्न करीत आहे. इतके वर्ष धर्म व जातीचे राजकारण करून समाजात व्देष पसरविण्याचे काम करीत आहे. काँग्रेसच्या राज्यात ओबीसी आरक्षण कमी करून ओबीसी चे हक्क व अधिकार डावलून अल्पसंख्याकांना आरक्षण देण्याचे काम केले आहे. डॉ. आगलावे यांनी निवेदनात नमुद केले की, काँग्रेसची भुमिका ओबीसी बद्दल नेहमीच भेदभावाची राहीली आहे. ओबीसी समाज हा अत्यंत मागासलेला असून त्याची आर्थिक व समाजिक उन्नत झालेली नाही याला कॉग्रेसच जबावदार आहे.

# अवकाळी पावसासह गारपीट;शेतकऱ्यांच्या शेती पिकाचे अतोनात नुकसान

## मेघगर्जनेसह लिंबाच्या आकाराची गार, शेतकऱ्याच्या डोळ्यात पाणी





**पुलगाव | प्रतिनिधी**

देवळी तालुक्यातील इंझाळा यासह विविध गावांमध्ये मेघगर्जनेसह अवकाळी पाऊस व जोरदार गारपीटीने हजेरी लावली जवळपास १५ ते २० मिनिट बोर ते लिंबाच्या स्वरूपाची गार झाल्याने शेतकऱ्यांच्या शेतातील पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे.हाता तोंडाशी आलेला घास शेतकऱ्यांचा हिरावण्याच्या मार्गावर आहे.

सायंकाळी साडेपाच वाजताच्या सुमारास इंझाळा, घोडेगाव, कोळोना, तळणी, विजयगोपाल, चोंडी,सोनोरा यासह देवळी तालुक्यातील वेगवेगळ्या भागात गारपिटीला सुरुवात झाली.शेतातील गहू,चना, भाजीपाला तसेच फळबागेचे अतोनात नुकसान झाले आहे. काही भागात वीज पुरवठा सुद्धा खंडित झाल्याने शेतकऱ्यांची तारांबळ उडाली आहे. झाडावर असलेला कापूस ओलाचिंब झाला असून शेतकऱ्याच्या डोळ्यात या झालेल्या नुकसानामुळे पाणी आले आहे. सरकारकडून मदतीची आर्त हाक शेतकऱ्यांनी दिली आहे.

# ताकडगाव येथे २० लक्ष रुच्या कामाचा शुभारंभ

**गेवराई | प्रतिनिधी**

बाळराजे दादा पवार आणि कार्यसम्राट आमदार लक्ष्मण पवार यांच्या विशेष सहकार्यातून २० लक्ष रूपये किंमतीच्या कामाचा शुभारंभ समारंभ युवा नेते शिवराज पवार यांच्या हस्ते दि ९ रोजी संपन्न झाला . त्यावेळी ज्येष्ठ मार्गदर्शक कैलास पवार ,छावा संघटनेचे जिल्हा राहुल चाळक, पत्रकार सुशील टकले ,किसन होंडे व

गावातील अविनाश मोटे,शिवाजी पवार ,कल्याण मोटे,बाळासाहेब मोटे,ग्राम पंचायत सदस्य,दत्ता गिरी,अनंत मोटे,मनोज केदार,रघुनाथ केदार,माजी पंचायत समिती सदस्य बन्सी डोळस,माजी सरपंच विजय डोळस,ज्येष्ठ मार्गदर्शक लोभा तात्या डोळस,माणिक केदार,लक्ष्मण जगदाळे,दिलीप डोळस,जालिंदर केदार, अमोल केदार,नारायण डोळस,सुधाकर केदार,अन्सराम घोडके,भीमराव



सुतार, लक्ष्मीकांत पालेकर,बाळु केदार,विकास केदार,प्रशांत डोळस,विकास केदार,नितीन डोळस,मनोहर गिरे,अंताराम जगदाळे, रंगनाथ राठोड,ग्रामरोजगार सेवक राजीव डोळस तसेच गावांतील इतर सर्व नागरीक उपस्थित होते.

# शासन आपल्यादारी या योजनेचा तालूक्यातील चांभार,ढोर,मोची,होलार,समाज बांधवांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा-जिल्हाव्यवस्थापक संगीता पराते

## गंगाखेड येथे लिडकॉम आपल्यादारी कार्यक्रमाचे आयोजन

**परभणी | प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या शासन आपल्या दारी या संकल्पने अंतर्गत लिडकॉम आपल्या दारी मध्ये गंगाखेड येथे मेळाव्याचे/ कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

सविस्तर वृत्त असे की, महाराष्ट्र शासनाच्या शासन आपल्या दारी या संकल्पने अंतर्गत लिडकॉम आपल्या दारी मध्ये मेळावा कार्यशाळा घेण्याच्या अनुषंगाने संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्या. मुंबई. जिल्हा कार्यालय परभणी च्या वतीने दि.१०/०२/२०२४ रोजी राजेश्वर फंक्शन हॉल, नवीन डि.पी. रोड, गंगाखेड, याठिकाणी सकाळी १०.३०. वा. मेळाव्याचे कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.



या मेळाव्यात कार्यशाळेत संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळा मार्फत चांभार, ढोर, मोची, होलार, या चार जातींतील समाज बांधवांसाठी महा मंडळाच्या कार्यरत योजना आहेत, त्या योजनांचा प्रसार व प्रचार तसेच चर्मकार समाजातील महिलांचे सक्षमीकरण व रोजगार मार्गदर्शन, तसेच युवक, युवतींसाठी महामंडळा मार्फत विविध प्रशिक्षण कार्यक्रम राबविणे, व महामंडळाच्या योजनांची सविस्तर माहिती देण्यात येणार आहे. या मेळाव्यासाठी कार्यशाळेसाठी मा. अप्पर जिल्हाधिकारी, परभणी. मा. तहसिलदार, गंगाखेड. मा. मुख्याधिकारी, नगर परिषद गंगाखेड. सहाय्यक आयुक्त समाज कल्याण, परभणी, मा. जिल्हा अग्रणी बँक अधिकारी, परभणी. तसेच यशस्वी उद्योजक, श्री. नरहरी सटवाजी सोनवणे, ब्राम्हणगाव, तसेच महामंडळाच्या जिल्हाव्यवस्थापक, परभणी तथा विभागिय अधिकारी, छत्रपती संभाजी नगर, श्रीमती संगिता पराते मॅडम महामंडळाच्या विविध कार्यरत योजनांची माहिती देण्यासाठी उपस्थित राहणार आहेत. तरी या मेळाव्याचा कार्यशाळेचा जास्तीजास्त चांभार, ढोर, मोची, होलार या समाज बांधवांनी लाभ घ्यावा असे आवाहन महामंडळाच्या जिल्हाव्यवस्थापक, श्रीमती, संगिता पराते यांच्या सह राष्ट्रीय चर्मकार महा संघाचे जिल्हा अध्यक्ष मूरलीधरजी ठोंबरे यांनी केले आहे.

# राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस (शरदचंद्रजी पवार) कडून फार्मसी विद्यार्थ्यांसाठी राज्यव्यापी आंदोलन

## जीपॅट उत्तीर्ण विद्यार्थ्यांना विद्यावेतन मिळवून देण्यासाठी मोठा लढा उभारणार: प्रदेशाध्यक्ष सुनिल गव्हाणे

**बीड | प्रतिनिधी**

केंद्र सरकारने शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून जीपॅट ग्रॅज्युएट फार्मसी प्टिट्यूड टेस्ट उत्तीर्ण विद्यार्थ्यांना देण्यात येणारे विद्यावेतन (स्टायपेंड) अचानकपणे बंद केले आहे. त्यामुळे अनेक होतकरू व गरजु विद्यार्थ्यांचे शैक्षणिक, आर्थिक नुकसान होत आहे. पदव्युत्तर फार्मसीचा रिसर्च प्रोजेक्ट आणि इतर शैक्षणिक खर्च मोठा असतो. तो सर्वांना पेलला जात नाही. अशातच सरकारने हि विद्यावेतन अचानकपणे बंद केल्याने फार्मसी विद्यार्थी अडचणीत आले आहेत.

गेल्या वर्षभरात शेकडो ग्रॅज्युएट फार्मसी प्टिट्यूड टेस्ट (जी पॅट) पात्र उमेदवारांना विद्यावेतनापासून वंचित ठेवण्यात आले आहे. नॅशनल टेस्टिंग एजन्सी (एनटीए) देशभरातील एम फार्म अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी जीपॅट परीक्षा आयोजित करते. चाचणीसाठी पात्र ठरलेल्यांना दोन वर्षांसाठी १२,४०० रुपये मासिक विद्यावेतन मिळते. साधारणपणे, प्रवेशानंतर तीन महिन्यांनी ते जारी केले जाते.प्रदेशाध्यक्ष सुनिल गव्हाणे यांनी सांगितले की, बी फार्मसी च्या विद्यार्थ्यांना जी पॅट परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर मिळणारी विद्यावेतन (स्टायपेंड) मागील काही महिन्यांपासून मिळाली नसल्याने आम्ही सर्व विद्यार्थी हे आंदोलन करत आहोत. राज्यातील सुमारे ३००० उमेदवार दरवर्षी हि परीक्षा उत्तीर्ण होतात. मात्र गेल्या एक वर्षापासून जी पॅट पात्र उमेदवार स्टायपेंडच्या प्रतीक्षेत आहेत. स्टायपेंड ही विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यासात यशस्वी होण्यासाठी प्रेरणा आहे. मात्र मोदी सरकार या विद्यार्थ्यांच्या बाबतीत अजिबात संवेदनशील नसुन देशभरातील लाखो विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य टांगणीला लागले आहे. या आंदोलनाचे राज्य समन्वयक प्रदेश सरचिटणीस प्रा.अमोल पाटील यांच्या माध्यमातुन फार्मसीच्या विद्यार्थ्यांची नोंदणी सुरू असून संपूर्ण महाराष्ट्रातून मोठ्या स्वरुपात फार्मसी विद्यार्थ्यांचा पाठिंबा मिळत आहे. त्यानंतर या सर्व विद्यार्थ्यांना सोबत घेऊन मागणी पूर्ण होत नाही तोपर्यंत राज्यभर धरणे आंदोलन करण्यात येणार आहे. बीड शहरात देखील राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस (शरदचंद्रजी पवार) कडून जिल्हाध्यक्ष पंकज बाहेगव्हाणकर आणि इतर आम्ही सर्व सहकारी मिळून धरणे आंदोलन करणार आहे, अशी माहिती अशी माहिती राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे प्रदेश संघटक कुंदन काळे यांनी दिली.

**जीपॅट बद्दल**

१. २०१८ पर्यंत ही चाचणी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद (AICTE) द्वारे घेतली जात होती.

२. २०१९ मध्ये ही चाचणी आयोजित करण्याची जबाबदारी एनटीएकडे सोपवण्यात आली.

३. ही चाचणी संस्थांना फार्मसीमधील पदव्युत्तर अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश घेण्यासाठी योग्य फार्मसी पदवीधरांची निवड करण्यास मदत करते.

४. जीपॅट ही तीन तासांची संगणक-आधारित ऑनलाइन चाचणी आहे आणि तिचे गुण सर्व -खउढए-मान्यताप्राप्त संस्था आणि विद्यापीठे स्वीकारतात.





सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .